# शहर बससेवेची देखभाल योग्य प्रकारे करावी - आयुक्त

नांदेड दि. १४ : शहरातील नागरिकांना दर्जेदार प्रवासी सेवा मिळावी, तसेच मनपाच्या शहर बससेवेच्या बसेसची देखभाल दुरुस्ती योग्य प्रकारे झाली पाहीजेत, याकरीता एस. टी. महामंडळ व टाटा मोटर्स यांनी संयुक्तपणे बैठक घेऊन प्रयत्न करावेत, असे आवाहन नांदेड मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक यांनी आज एका बैठकीत केले.

नांदेड वाघाळा शहर मनपाने एस.टी. महामंडळाच्या माध्यमातुन ११ महिन्यापुर्वी शहर बससेवा सुरु केली. यात २० मिनी बस तर १० मोठया बसेसचा समावेश आहे. ही सेवा चालु ठेवताना एस. टी. महामंडळाच्या वतीने टाटा मोटर्सने बसेस देताना गुणवत्ता तपासली गेली नसल्याचा आक्षेप नोंदवला होता. त्यामुळे बसेसव्दारे शहरातील जनतेला चांगल्या प्रकारची प्रवासी सुविधा देण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे मत महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडुन मांडल्या गेले होते.

या प्रकाराची दखल घेऊन मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक यांनी एस. टी. महामंडळ, टाटा मोटर्सचे अधिकारी, मनपाचा परिवहन विभाग यांची संयुक्त बैठक आज स्थायी समिती सभागृहात घेतली. या बैठकीस यांत्रिकी विभागाचे तज्ञ म्हणुन श्री गुरु गोविंदसिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रोडक्शन इंजीनिअरींग विभागाचे प्रा. व्यंकटेश यांना खास निमंत्रीत करण्यात आले होते.

बसेसमध्ये काहीही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या,तर त्या सोडविण्यासाठी आम्ही बांधील आहोत. या समस्या पाहण्यासाठी गुरुवारी (दि.१५) एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन सर्व बसेसची तपासणी करु, असे टाटा मोटर्सच्या वतीने सांगण्यात आले. शहरबस चालवणाऱ्या चालक व मेकॅनिक यांना पुन्हा प्रशिक्षण देण्याचीही तयारी टाटाच्या वतीने दर्शविण्यात आली. या बैठकीतुन आपले समाधान झाले असुन टाटा मोटर्सच्या वतीने भविष्यकाळात चांगले सहकार्य मिळेल अशी भावना एस.टीच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

बैठकीत टाटा मोटर्स आणि महामंडळाच्या अधिकाऱ्यांमध्ये चांगला सुसंवाद झाला. टाटा मोटर्सच्या वतीने विभागीय सेवा व्यवस्थापक (बस) परविंदरसिंघ, विभाग विक्री व्यवस्थापक सुर्यप्रकाश, सुनील वाकोडे, उमेश अन्सारी, बाफना मोटर्सचे म. अब्दुल खालेद, एस. टी. महामंडळाच्या वतीने यांत्रिकी अभियंता आर.एन. बनसोड, आगार प्रमुख वावळे यांच्यासह सहाय्यक आयुक्त महेश वडदकर, परिवहन अधिकारी राजकुमार वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

---